# प्रकरण ४ थे

## बार्शी तालुक्याची आर्थिक, व्यापारी व औद्योगिक रूपरेषा


४·१ भौगोलिक स्थान

४·२ क्षेत्रफळ

४·३ नद्या व धरणे

४·४ हवामान व पर्जन्यमान

४·५ लोकसंख्या

४·६ शेती

४·७ ओलीताखालील क्षेत्र

४·८ बार्शी तालुक्यातील सहकारी संस्था

४·९ बार्शी शहराची व्यापारी व औद्योगिक परंपरा

४·९·१ व्यापार

४·९·२ औद्योगिक विकास

४·९·३ बँका


-x-x-x-x-x-

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# सोलापूर जिल्हा




नकाशा क्र. ४.१

४·१ भौगोलिक स्थान :

सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेला असून त्याचे भौगोलिक स्थान १७$^{0}$-१० १८$^{0}$ -३२ उत्तर अक्षांस व ७४$^{0}$ - ४२ ते ७६-१५ पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. जिल्हयाच्या उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद हे जिल्हे आहेत. पूर्वेस उस्मानाबाद जिल्हा व आंध्रप्रदेश, दक्षिणेस सांगली जिल्हा व कर्नाटक राज्य आणि पश्चिमेस सातारा व पुणे जिल्हे आहेत.[१]

सोलापूर जिल्हयात एकूण ११ तालुके असून बार्शी हे तालुक्याचे ठिकाण, सोलापूर पासून उत्तरेस सुमारे ६० कि.मी. अंतरावर आहे. बार्शी तालुक्यात एकंदर १३६ गांवे आहेत. बार्शीच्या ईशान्य बाजूस उस्मानाबाद जिल्हा पश्चिमेस सोलापूर जिल्हयातील माण व मोहोळ तालुके आहेत.

४·२ क्षेत्रफळ :

सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुका हा, क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा तालुका आहे. बार्शी तालुक्याचे क्षेत्रफळ १,६५,३७७ चौरस हेक्टर असून, लागवडीखालील असलेली जमीन सुमारे १,१३,०८७ हेक्टर व त्यापैकी पाण्याखाली असलेल्या जमीनीचे क्षेत्रफळ फक्त ९,२४६ हेक्टर आहे.[२] एकूण क्षेत्रफळापैकी लागवडी-खालील क्षेत्र ६८·३८ % आहे. आणि एकूण लागवडीच्या पाण्याखालील क्षेत्र फक्त ८·१७ % आहे. यावरुन जिरायत जमीनीचे क्षेत्र जास्त आहे हे स्पष्ट होते. बागायत क्षेत्रामध्ये बहुतेक विहीरी व पाझर, तलाव या जलसिंचन साधनांचा समावेश आहे.

४·३ नद्या व धरणे :

सोलापूर जिल्हयातील भिमा ही मुख्य नदी असून ती पश्चिमेकडून पुर्वेकडे वाहते. सिना, निरा, आणि माण या नद्या भिमेला येऊन मिळतात. इतर अनेक लहान मोठे जलप्रवाह जिल्हयातून वाहतात. परंतु त्यांचा शेतीला पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने उपयोग होत नाही.

बार्शी तालुका क्षेत्रामधून सिना, येराई, भोगावती, नागझरी इ. नद्या वाहतात. पाथरी आणि कोरेगांव येथील तलाव बार्शी तालुक्याच्या हद्दीत आहेत. परंतु त्यांच्यापासून शेतीला बारमाही पाणी पुरवठा होऊ शकत नाही. तथापी बार्शी शहराला पाथरी तलावापासून पाणीपुरवठा होतो.

४.४ हवामान व पर्जन्यमान :

सोलापूर जिल्हयातील कमाल तपमान ४३.३$^0$ सेन्टीग्रेड व किमान तपमान १०.०$^0$ सेन्टीग्रेड आहे. बार्शी तालुक्यातील कमाल तपमान ४६.०$^0$ सेन्टीग्रेड व किमान तपमान १७.०$^0$ सेन्टीग्रेड आहे.[३]

जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या चार महिन्यात पाऊसमान बरे असते. त्यानंतर अधुन मधुन वळिव स्वरूपाचा पाऊस पडतो. ऑक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी या चार महिन्यात हिवाळा असतो. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल व मे चार महिने उन्हाळ्याचे असतात.

संपूर्ण सोलापूर जिल्हयात फारच कमी अनियमीत स्वरूपाचा पाऊस पडतो. मान्सूनचा पाऊस जूनच्या दुस-या पंधरवड्यापासुन सप्टेंबर अखेर असतो. सोलापूर जिल्हयात सरासरी ५८४ मि. मि. पाऊस पडतो. बार्शी तालुक्यात सरासरी ६५७.४ मि.मि. पाऊस पडतो. आवश्यकतेपेक्षा हे पाऊसाचे प्रमाण फारच कमी आहे.

४.५ लोकसंख्या :

१९८१ च्या जनगणनेनुसार बार्शी तालुक्याची एकूण लोकसंख्या २,७६,७५७ इतकी आहे. त्यापैकी ग्रामीण लोकसंख्या २,०४,२२० असून शहरी लोकसंख्या ७२,५३७ इतकी आहे.[४] एकूण लोकसंख्येमध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ७३.७९% आहे, तर शहरी लोकसंख्याचे प्रमाण २६.२१ % आहे.

बार्शी तालुक्याची एकूण लोकसंख्या सोलापूर जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येच्या १०.६०% आहे.

४·६ <u>शेती</u> :

बार्शी तालुक्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे· बार्शी तालुक्यातील जमीन हलक्याप्रतिची तांबडी असून , नदी काठची जमीन काळी व कसदार आहे· परंतु हलक्या प्रतिची, जिरायती आणि पावसावर अवलूंबून असणारी जमीन अधिक आहे·

सारणी क्रमांक ४·१

बार्शी तालुक्यातील जमीनीचा वापर

(क्षेत्रफळ ०० हेक्टर मध्ये)

| अ·नं· | तपशील | १९७९-८० | १९८०-८१ | १९८२-८३ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १· | एकूण भौगोलिक क्षेत्र | १६५४ | १५९७ | १६५४ |
| २· | जंगल व्याप्त क्षेत्र | २६ | २६ | २६ |
| ३· | शेतीस उपलब्ध नसलेले क्षेत्र | ३९ | ४० | ४० |
| ४· | लागवडीलायक क्षेत्र | उ·ना· | उ·ना· | १५४३ |
| ५· | निव्वळ पिकाखालील क्षेत्र | उ·ना· | उ·ना· | १२४५ |
| ६· | एकापेक्षा जास्त पिकांच्या-खालील क्षेत्र | उ·ना· | उ·ना· | २३ |
| ७· | एकूण लागवडीखालील क्षेत्र | उ·ना· | उ·ना· | १२६८ |

आधार : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन व सोलापूर जिल्हा १९८२-८३, १९८३-८४, १९८४-८५ या तीन वर्षाच्या एकत्रित व १९८७-८८ पान नं·२९

उ·ना· = उपलब्ध नाही·

४·७ ओलिताखालील क्षेत्र :

बार्शी तालुक्यातून एखादी मोठी नदी वाहात नाही आणि कालवेही नसल्यामुळे विहिरी, लहान तळी, लहान नद्या, ओढे यांच्यामार्फत शेतीला पाणी पुरवठा होतो· जलसिंचनाच्यासोयीनुसार ओलिताखालील क्षेत्र सारणी क्र· ४·२ मध्ये दिलेले आहे·

सारणी क्रमांक ४·२

बार्शी तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्र

(क्षेत्रफळ हेक्टरमध्ये)

| अ·नं· | जलसिंचनाचे मार्ग | १९७९-८० | १९८०-८१ | १९८२-८३ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १· | पृष्ठभागीय | १४३० | १२७ | ११४८७ |
| २· | विहिर | ६३३१ | १२३३१ | ५०२३ |
| ३· | ओलिताखालील निव्वळ क्षेत्र | ७७६१ | १२४५८ | १६५१० |
| ४· | ओलिताखालील एकूण क्षेत्र | १५४४३ | १७०९८ | १८३७१ |

आधार : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सोलापूर जिल्हा, १९८७-८८ पान नं·३६·

१९७९-८० मध्ये पृष्ठभागीय मार्गाने सुमारे १४३० हेक्टर जमिनीला पाणी पुरवठा होत होता· १९८२-८३ साली हे प्रमाण ११,४८७ हेक्टरनी वाढले·

१९७९-८० ते १९८०-८१ या काळात विहिरीमार्फत होणारे जलसिंचन क्षेत्र वाढल्याचे दिसते· आणि पुन्हा कमी झाल्याचे दिसते·

बार्शी तालुक्यात एकूण विहिरी ४७८२ असून त्यापैकी वापरात नसलेल्या विहिरींची संख्या १३९ इतकी आहे. आणि एकंदर कुपनलिकांची संख्या २२६ इतकी आहे.[५]

## सारणी क्रमांक ४.३

### बार्शी तालुक्यातील पिकांचा आकृतीबंध

(क्षेत्रफळ हेक्टरमध्ये)

| अ.नं. | पिके | १९७९-८० | १९८०-८१ | १९८२-८३ |
|---|---|---|---|---|
| अ) | तृणधान्ये (एकूण) | १.१२,४७३ | १,०६,५७६ | ८८,४८७ |
| | १. तांदूळ | १,१४६ | ९४६ | ७७१ |
| | २. गहू | ८,५८८ | ८,२२१ | ३,५७२ |
| | ३. ज्वारी (खरीप) | १,३५० | ३,१८० | २,९६९ |
| | ४. ज्वारी (रब्बी) | ९७,९६३ | ९०,९५४ | ७९,३८७ |
| | ५. बाजरी | ७७४ | ६७४ | ५३० |
| | ६. मका | ८४२ | १,५५२ | ८१३ |
| | ७. इतर तृणधान्ये | १,८१० | १,०४९ | ४४५ |
| ब) | कडधान्ये (एकूण) | २९,७८७ | ३०,०१० | २७,०७८ |
| | १. हरभरा | ५,३४६ | ४,५०० | ५,१९३ |
| | २. तूर | १९,७४९ | १९,७८० | १७,७४८ |
| | ३. मूग | ८१९ | ९०० | १,३८० |
| | ४. इतर कडधान्ये | ३,८७३ | ४,८३० | २,७५७ |
| क) | गळीत धान्य (एकूण) | ९,०९५ | ७,८६२ | ७,८१० |
| | १. भुईमूग | ४,५३५ | ४,६११ | ३,३८९ |
| | २. जवस | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

सारणी क्रमांक ४·३ पुढे चालू

| अ·नं· | पिके | १९७९-८० | १९८०-८१ | १९८२-८३ |
|---|---|---|---|---|
| | ३· करडई | ३,०५६ | २,०१४ | १,६३२ |
| | ४· इतर गळिताची धान्ये | १,५०४ | १,२३७ | २,७८९ |
| ड) | तंतू पिके (एकूण) | २,९८७ | ३,३४५ | ३,३६५ |
| | १· उस | ६६१ | ६६२ | १,६०२ |
| | २· मसाल्याचे पदार्थ | ६९८ | ९१७ | ७७१ |
| | ३· कापूस | ३६ | १७ | १८ |
| | ४· फळे व भाजीपाला | ९१५ | १,०५२ | ६४४ |
| | ५· इतर तंतू पिके | ६७७ | ६९७ | ३३० |
| इ) | इतर पिके (एकूण) | १४४ | ३७४ | २४ |
| | १· तंबाखू | उ·ना· | २२ | २१ |
| | २· इतर औषधी व मादक पदार्थ | उ·ना· | १३ | ३ |
| | ३· चा-याची पिके | उ·ना· | उ·ना· | पिक नाही· |
| | ४· संकीर्ण अखाद्य पिके | १४४ | ३३९ | पिक नाही· |
| | एकूण पिके | १,५४,४८६ | १,४८,१६७ | १,२६,७६४ |

आधार : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,सोलापूर जिल्हा १९८७-८८ पान नं·३८,४०,४४,४६,४८·

सारणी क्र·४·३ वरुन असे दिसते की, १९७९-८०पासून तृणधान्याच्या लागवडीखालील क्षेत्र कमी होत आहे आणि कडधान्य खालील क्षेत्र वाढत आहे· शिवाय तंतूपिकाच्या लागवडीचे क्षेत्र ही वाढत आहे· तथापी गळीत धान्याच्या लागवडीखालील क्षेत्रामध्ये घट झालेली दिसते· एकंदरीत लागवडीचे क्षेत्रही या काळात घटलेले दिसते· रब्बी ज्वारीच्या पिकाखाली सर्वात अधिक क्षेत्र असले तरी तेही या काळात घटल्याचे दिसते· तूलनेने खरीप ज्वारीचे क्षेत्र वाढले आहे·

## ४·८ बार्शी तालुक्यातील सहकारी संस्था :

जून १९८९ अखेर नोंदणीकृत सहकारी संस्थांची संख्या १६६ इतकी होती· सा रणी क्रमांक ४·४ वरून असे दिसते की, प्राथमिक सेवा सहकारी संस्था, दुध सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, कर्मचारी पतसंस्था, सहकारी ग्राहक भांडारें, गृहनिर्माण सहकारी संस्था, नागरी पत संस्था, यांची संख्या इतर सहकारी संस्थांच्या तुलनेने बरी आहे· पाण्याच्या अपु-या सोयीमुळे पाणीपुरवठा सहकारी संस्था फक्त एकच आहे· सहकारी साखर कारखाना एक आहे· अर्बन बॅन्क एक आहे, सहकारी चळवळीतील हा असमतोल नैसर्गिक घटकांच्यावर आधारलेला आहे·

### सा रणी क्रमांक ४·४

### बार्शी तालुक्यातील सहकारी संस्था ( ३०·६·१९८९ )

| अ·नं· | संस्थांचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १· | प्राथमिक सेवा सहकारी संस्था | ११५ |
| २· | अर्बन बॅन्का | १ |
| ३· | नागरी पत संस्था | १२ |
| ४· | कर्मचारी पतसंस्था | २० |
| ५· | गिरणी कामगारांच्या पतसंस्था | २ |
| ६; | मिल व हॅन्डस सोसायटया | २ |
| ७· | साखर कारखाना | १ |
| ८· | प्रक्रिया सहकारी संस्था | ४ |
| ९· | विणकर संस्था /यंत्रमाग संस्था | २ |
| १०· | औद्योगिक सहकारी संस्था | ३३ |

सारणी क्रमांक ४·४ पुढे चालू

| अ·नं· | संस्थेचे नाव | संख्या |
|---|---|---|
| ११· | दूध सहकारी संस्था | ५३ |
| १२· | मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था | २१ |
| १३· | कुक्कुट पालन सहकारी संस्था | ५ |
| १४· | औद्योगिक सहकारी संस्था | २ |
| १५· | सामुदायिक शेती सहकारी संस्था | २ |
| १६· | पाणीपुरवठा सहकारी संस्था | १ |
| १७· | सहकारी ग्राहक भांडारे | १७ |
| १८· | गृहनिर्माण सहकारी संस्था | २४ |
| १९· | आरोग्य सहकारी मंडळ | १ |
| २०· | सर्वसाधारण सहकारी संस्था | २ |
| २१· | देखरेख संघ | १ |
| २२· | मजूर सहकारी संस्था | ४५ |
| | एकूण ·· | ३६६ |

आधार : सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, बार्शी·

४·९ <u>बार्शी शहराची व्यापारी व औद्योगिक परंपरा</u> :

मुंबईकर निर्यातदारांची धनलक्ष्मी आणि मराठवाडयाची कृषी संपत्ती यांचा प्रितीसंगम बार्शीला घडून आला आहे आणि त्याबरोबरच त्यांचे भाग्य उजळून निघाले असे डी·पी·कुलकर्णी यांच्या लिखानात आढळून येते·[६]

शहाजोग व्यापारी पेठ म्हणून फार जुन्या काळापासून बार्शीची प्रसिध्दी आहे· अठराव्या शतकापूर्वी ३ ते ४ हजार वस्ती असलेल्या बार्शी गांवची आज

शहर म्हणून वाढ झालेली आहे ती, मुख्यत: येथील व्यापारामुळेच. म्हणून व्यापारातून संपादन केलेल्या संपत्तीतूनच बार्शीचे नागरी जीवन घडविले गेले आहे. व्यापारामुळे नागरिकांना उदरनिर्वाहाचे साधन मिळाले, सार्वजनिक संस्थांना निधी व नेतृत्व लाभले. कारखानदारीला प्रेरणा, कच्चा माल, व भांडवल इत्यादींचा पुरवठा झाला.

दळणवळणाच्या साधनाचा अभाव असताना बैलाच्या पाठीवर मालाच्या गोण्या टाकूण लमाणांचे तांडेच्या तांडे या पेठेतून त्या पेठेत मीठ, मिरची, मसाल्याचे पदार्थ, नारळ, कापड, किराणामाल या जिनसांची देवघेव करीत हिंडताना दिसतात. त्याकाळी बार्शी तालुक्यातील वैराग गांव व्यापारात बार्शीच्याही पुढे होते. सन १८५९-६० मध्ये कुर्डुवाडीला रेल्वे आल्याने व तेथून पुढे बार्शी ते कुर्डूवाडी असा डांबरी रस्ता झाल्याने या शहराचे महत्व वाढले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बार्शीला पोस्टाची व्यवस्था झाली. इ.स. १९०४ साली बार्शी ते कुर्डुवाडी रेल्वे सुरु झाली. त्यानंतर बार्शी कुर्डुवाडी, बार्शी-सोलापूर, बार्शी लातूर, बार्शी बीड, परळी वगैरे रस्ते झाले. मराठ-वाड्याच्या सिमेला बेटासारखे वसलेले या शहराला दळणवळण व वाहतुकीच्या सोयींमुळे भरपूर फायदा झाला. बार्शी शहराचा आणि मराठवाड्याचा तसा फार जुना ऋणानुबंध आहे. मराठवाड्याने शेतमाल पिकवावा आणि विक्रीसाठी बार्शीस पोहचता करावा असे वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा आहे. "मराठ-वाड्यात पिकलेल्या मालाची बाजारपेठ आणि मराठवाड्याला लागणा-या मालाची उतारपेठ म्हणून बार्शीची प्रसिध्दी आहे:-

४.९.१ <u>व्यापार</u> :

" बार्शीचा मुख्य बाजार म्हणजे अडतीचा. बार्शी बाजारपेठेच्या इतिहासातील तेजस्वी कालखंड म्हणजे अमेरिकन यादवी युध्दाच्या कालापासूनचा, म्हणजे सन १८६१ नंतरचा म्हणजे बार्शी ते लातूर रेल्वे मार्ग अस्तित्वात आला तेंव्हा पासूनचा सन १९११-१९१२ पर्यंन्त शहराच्या सोमवार पेठेत अडत्याचा

व्यापार चालत होता. त्यावेळी १० ते १५ व्यापारी अडत्याचा व्यापार करीत असत. सन १९११-१२ च्या सुमारास बार्शी लातुर रेल्वे झाल्यापासून बार्शीच्या कापूस बाजाराला उतरती कळा लागली.*७

इ.स. १९४७ साली अडत व्यापारास मार्केट अॅक्ट लागू करण्यात आला व बाजाराच्या नियंत्रणासाठी व विकासासाठी इ.सन १९४९ मध्ये मार्केट कमीटीची स्थापना झाली. त्यानुसार सध्या ३८ शेतमालाचे नियंत्रित बाजारपेठेच्या नियमानुसार शेतमालाचे नियमन केले जात असून एकूण २३१ अडत्ये व २४० खरेदीदार आहेत.

बार्शीत अडत व्यापारानंतर दुस-या क्रमांकाचा व्यापार किराण्याचा होता व आजही आहे. स्टेशनरी, आयुर्वेदिक, देशी व विदेशी औषधे, लोखंड व्यापार, कापडाचा व्यापार, सराफाचा व्यापार, सराफ बाजार आणि लाकडाचा व्यापार इत्यादी बाजारपेठेचा मोठ्या प्रमाणावर विकास झालेला आहे.

४.९.२ <u>औद्योगिक विकास</u> :

अ) <u>कापड गिरण्या</u> :

बार्शीच्या व्यापारी व औद्योगिक प्रगतीत रेल्वेचा सिंहाचा वाटा आहे. रेल्वे पासूनच बार्शी शहराच्या जीवनात यंत्र युगाचा प्रवेश झाला. कापसाची आवक मोठ्या-प्रमाणावर असल्यामुळे प्रथम कारखानदारी सुरु झाली. ती कापसाची सरकी काढून रुईच्या गाठी बांधण्याच्या उद्योगाची. २० व्या शतकाच्या सुरवातीला १२ जिनींग फॅक्टरी होत्या. इ.स. १९११ मध्ये श्री. भगवंत मिल (सध्याची राजेन मिल) सुरु झाली व तेथे कापडाचे उत्पादन सुरु झाले. सन १९२३ मध्ये जयशंकर व लोकमान्य या सूत गिरण्या सुरु झाल्या. या तिन्ही कापड गिरण्यात मिळून सध्या सुमारे ३ ते ४ हजार मजूर काम करतात.

ब) डाळ प्रक्रिया कारखाने :

दगडी जात्यात तूर भरडून डाळ तयार करण्याची पद्दती फार पूर्वीपासुनची आहे. मात्र उत्पादन कमी प्रमाणात होते म्हणून यांत्रिक पद्दतीने मोठ्या प्रमाणावर डाळ तयार करुन त्याला कारखानदारीचा दर्जा मिळवून देण्याचे श्रेय बार्शीचे श्री.धोंडीराम नंदराम खटोड यांनाच आहे. आज २५ डाळ कारखाने असून डाळीचा दर्जा चांगला ठेवण्यामध्ये खूप प्रयत्न केलेले आहेत. म्हणूनच बार्शी डाळीने दक्षिण भारतात प्रसिद्दी मिळविली आहे.

क) तेल गिरण्या :

" यांत्रिक पद्दतीने तेल गाळण्याचा उद्योग बार्शीत प्रथमत: श्री.तम्मेवार यांनी सुरु केलेला आहे. त्यापूर्वी दगडी अथवा लाकडी घाण्यावर तेली लोक मजूरीने तेल गाळीत असत. त्यानंतर महाराष्ट्र ऑईल मिल निघाली. ती प्रथम कसबे तडवळे येथे होती. परंतु तिला पुरेसा कच्चा माल मिळत नसल्यामुळे ती बार्शीत आणली गेली. इ.सन १९३७ नंतर पुढे गुजराथ ऑईल, श्री.ऑईल मिल, विजय ऑईल मिल, क्रान्ती ऑईल मिल, भारत ऑईल मिल, बालाजी ऑईल मिल, लक्ष्मी ऑईल मिल इत्यादी तेलगिरण्या सुधारलेल्या यंत्रसामुग्रीसह सुरु झाल्या. तेल गिरणीस लागणा-या शेंगा, शेंगदाणे, जवस व करडी, एरंडी इत्यादी तेलबियांची आवक वाढल्याने तेलगिरण्यांचा उद्योग थोड्या काळातच विकसित झाला."

सध्या बार्शी शहरात १२ तेलगिरण्या (एक्सपिलर्स) आहेत, तर तेल घाणी (रोटरी) ची संख्या ८ (आठ) आहे.

बार्शीतील तेलगिरण्या साधारणत: वर्षातून ९ महिने तेलबिया गळीताचा हंगाम करतात. तेलबिया गळितांचा उतारा साधारणत: खालील प्रमाणे आहे :

१) शेंगदाणा तेलाच्या एका बॅरल साठी ५ क्विंटल शेंगदाणा एक तासात गळित केला जातो.

२) करडईच्या तेलाच्या एका बॅरेलसाठी ८ क्विंटल (१० पोती) करडई २ तास गळित करावे लागते.

३) सुर्यफुलाच्या एका बॅरेलसाठी ६ क्विंटल (१२ पोती) सुर्यफुल दिड तास गळित करावे लागते.

४) बार्शीमध्ये पुनामिया ऑईल मिल ही अखाद्य तेलाचे गळित करणारी एकमेव तेलगिरणी आहे. या तेलगिरणीला साधारणत: वर्षाला ४०,००० ते ६०,००० निंबोळी बिया लागतात. निंबोळी तेलाच्या एक बॅरल तेलासाठी २० क्विंटल (४० पोते ) निंबोळी बियांचे चार तास गळित करावे लागते.

५) बार्शी शहरात एकूण तेल घाणी (रोटरी) ची संख्या आठ आहे. " बार्शी तेली समाज उत्पादक सहकारी संस्था लि.," ही संस्था तेली समाजाने स्थापन केलेली आहे. भारतीय खादी ग्रामोद्योगामार्फत मिळणा-या सोयी सवलतीचा फायदा मिळवून देण्याचे काम ही संघटना करीत असते. खादी ग्रामोद्योगामुळे तेल उत्पादकांना कर्जपुरवठा व प्रशिक्षण दिले जाते. खादी ग्रामोद्योगांनी पुरविलेल्या सवलतींमध्ये तेली समाजाला होणारा आर्थिक फायदा म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत खरेदी केलेल्या शेंगा व करडई तेलबियांवरील विक्री कर माफ केलेला आहे. तसेच शेंगा व करडईच्या तेलविक्रीवर असलेला विक्री कर पूर्णपणे माफ केलेला आहे.

६) साधारणत: एका तेलघाणीस ३० ते १०० क्विंटल शेंगदाणे लागतात. एक क्विंटल शेंगदाण्यापासून ३५ ते ४० किलो तेल आणि ६० किलो पेंड निघते. याच प्रमाणात एक क्विंटल करडईपासून २२ ते २५ किलो तेल आणि ३० किलो पेंड मिळते.

थोडक्यात बार्शीतील तेलगिरण्याचा व तेल घाण्यांचा व्यापार मोठ्या-प्रमाणावर आहे हे स्पष्ट होते.

ड) <u>विडी कारखानदारी</u> :

बार्शीच्या विडी कारखान्यांची सुरुवात तपकीरीच्या उद्योगातून झाली.

निपाणी, सातारा इत्यादी ठिकाणी तंबाखू खरेदी करुन त्यापासून तपकीर तयार करण्याचा व्यवसाय फार जूना होता. " तपकीरीच्या जोडीला विडया बांधण्याचा घरगुती धंदा म्हणून श्रीमती कोंदनबू या एका बाईने प्रथम सुरु केला. इतर लोकांनी या स्त्रीचे अनुकरण केले व विडया बांधण्याचा व्यवसाय बार्शीत सुरु झाला. सध्या सुमारे ८00 मजूरांना या उद्योगांवर रोजगार मिळालेला आहे."[८]

इ) इतर उद्योग :

मिठाई, उदबत्ती, साबण, फौंटनपेन, यासारख्या लघुउद्योग क्षेत्रातील उद्योग अलीकडे म्हणजे स्वातंत्र्यानंतर सुरु झाले. यंत्रदुरुस्ती लेथ व वर्कशॉप, लोखंडी फर्निचर, तिजो-या व अन्य लोखंडी सामान सफाईदारपणे व आकर्षक स्वरुपात बनविणारे उद्योगही बार्शीत आहेत.

४.९.३ बँन्का :

उद्योगधंद्याचा जीवनदाता म्हणजे बँन्क. आधुनिक काळात बँन्काशिवाय उद्योगधंद्याच्या क्षेत्रात पूर्णत्व येउ शकत नाही. "बार्शीत पूर्वी इंपिरियल बँन्क (स्टेट बँन्क ऑफ इंडीया) ही एकच बँन्क होती. अर्बन को.ऑप. बँन्क ही देखील जुन्यापैकी एक बँन्क आहे. १९३८ साली सेंट्रल बँन्क सुरु झाली. त्यानंतर १९४१ मध्ये युनायटेड बँन्क आली. १९50 नंतर मिरज बँन्क, स्टेट बँन्क, बेळगांव बँन्क, बँन्क ऑफ महाराष्ट्र, सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को.ऑप. बँन्क, मर्चंटस् को.ऑप. बँन्क, इत्यादी बँन्का बार्शीत सुरु झालेल्या आहेत."[९] बार्शी शहर बँन्कांच्या बाबतीत अत्यंत अनुकूल आहे, कारण तेथील व्यापारी उलाढाल होय.

-x-x-x-x-x-

संदर्भ :

१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - सोलापूर. ८७-८८ पा.नं.१.

२. प्राचार्य च.बं.शितोळे : बार्शी तालुक्याच्या कृषी-विकासाची नवी दिशा, रौप्यमहोत्सवी स्मरणिका- "स्मृतीगंध" कृषी उत्पन्न बाजार समिती, ७ जुलै, १९७६.

३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - सोलापूर. ८७-८८ पा.नं.१.

४. तत्रैव पान नं. ३३

५. श्री.डी.पी.कुलकर्णी : बार्शी शहराची व्यापारी व औद्योगिक परंपरा, रौप्यमहोत्सवी स्मरणिका - "स्मृतीगंध" कृषी उत्पन्न बाजार समिती, ७ जुलै, १९७६ पान नं.१

६. तत्रैव पान नं. १.

७. तत्रैव पान नं. ३

८. तत्रैव पान नं. ७

९. तत्रैव पान नं. ७

=0=0=0=0=0=